# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रसिद्धीपत्रक

- **दुर्गामातेच्या विसर्जनासाठी मिरा भाईंदर महापालिकेतर्फे शहरातील ९ विसर्जन स्थळे निश्चित**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात २२ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत असलेला नवरात्रोत्सव भक्तिभावाने व उत्साहात साजरा होत आहे. दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी दुर्गामातेच्या विसर्जनच्या पार्श्वभूमीवर, हा उत्सव सुरक्षित व पर्यावरणपूरक होण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने नियोजन केले आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्ष्यतेखाली मा.पोलिस उपायुक्त राहूल चव्हाण (भा.पो.से.) व मनपा अति. आयुक्त संभाजी पानपट्टे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दुर्गामाता विसर्जन करण्यासाठी मनपा क्षेत्रात खालील ९ अधिकृत विसर्जन स्थळे निश्चित करण्यात आली आहे.

- **विसर्जन स्थळे:**

१) भाईंदर (प.), मेरीटाईम जेट्टी

2) उत्तन समुद्र किनारा

३) स्व. आनंद दिघे मैदान, नवघर

४) भाईंदर (पूर्व), चौपाटी जुनी

५) भाईंदर (पूर्व), चौपाटी नविन

६) शिवार गार्डन

७) सातकरी तलाव, एम.आय.डी.सी., मिरांगाव

८) सुकाल तलाव, पेणकरपाडा

९) घोडबंदर रेतीबंदर

महानगरपालिका प्रशासनाने प्रत्येक विसर्जन स्थळी सुरक्षा आणि सुविधांची पूर्तता करण्याची काळजी घेतली असून मंडप व स्टेज, प्रकाशव्यवस्था (लाईट्स), टेबल व व्यवस्थापन साहित्य अशा विविध सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. शहरातील सर्व नागरिक, मंडळे व भक्तगणांनी महापालिकेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून, पर्यावरणाची काळजी घेत वरील निश्चित केलेल्या ठिकाणी दुर्गा मातेचे विसर्जन करावे. असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.